MHWS08001326-2020

## निशाणी ७२ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी पुढील आदेशापर्यंत वाद मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती कायम राहावी याकरिता 'जैसे थे' परिस्थिती ठेवणेबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, प्रस्तुत प्रकरण हे नि.क्र.७० वर प्रतिवादीचे म्हणणे येणे करिता व सुनावणीसाठी ठेवले आहे. आजरोजी प्रतिवादींनी नि.क्र.७० वर म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिवादी हे वाद जागेवर बांधकाम करत असून बांधकाम पुर्ण केल्यास नि.क्र.७० वरील अर्जास कोणताही अर्थ राहनार नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील वाद मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवणेबाबत आदेश होण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी आपले म्हणणे देवून विरोध दर्शविला. प्रतिवादीतर्फे कथन की, प्रतिवादी हे वाद जागेवर बांधकाम करत नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा व जवळील तारीख दिल्यास प्रतिवादी आपला जबाब दाखल करतील. त्यामुळे सत्यपरिस्थिती कोर्टासमोर येईल. त्यामुळे सदरचा अर्ज खारीज व्हावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे विचारात घेता खालील मुद्दे या अर्जाच्या निकालासाठी उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे देण्यात आले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्याप्रमाणे जैसे थे परिस्थीती ठेवण्याचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | नाही. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## ***का र ण मि मां सा***

**५.** वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, त्यावरील म्हणणे, कागदपत्रे व एकंदर परिस्थिती विचारात घेता असे निदर्शनास येते की, सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द उदघोषणा होवून मिळण्याबाबत, ताब्याकरिता व मनाई करिता दाखल केलेला आहे. वादी यांनी नि.क्र.७० वर तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याबाबात अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल करण्याकरिता प्रकरण प्रलंबीत आहे. वादीचे कथनाप्रमाणे प्रतिवादींनी वादमिळकतीत बेकायदेशीर बांधकाम करणे सुरु केले आहे. मात्र वादीने प्रस्तुतचा अर्ज शपथेवर सादर केलेला नाही. तसेच चालू बांधकामाबाबातची आजरोजीची वस्तुस्थिती देखील अर्जामध्ये नमूद केलेली नाही. तसेच सद्यस्थितीतील आजरोजीची बांधकामाची छायाचित्रे देखील अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. आजरोजीची वाद मिळकतीबाबतची सद्यपरिस्थिती अभिलेखावर आलेली नसल्याने वाद मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ बाबत मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:

## **आ दे श**

अर्ज नि.क्र.७२ नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.02.27 15:44:00 +0530

( दिनेश मु. गायकवाड )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
रिसोड.

दि.२७/०२/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Order**.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade, (Grade-III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 27.02.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 27.02.2026 |
| **Order uploaded on** | **:** | 27.02.2026 |